# 9 मार्च

## आजचा सुविचार :

“नेहमी खरे बोलावे.”

## आजचे पंचांग :

वार – बुधवार दिनांक : 9 मार्च 2022

मास - फाल्गुन नक्षत्र – कृतिका

सूर्योदय – सकाळी 6. 46 वाजता सायंकाळी 6. 42 वाजता

## आजचे दिनविशेष :

1951 ला प्रसिद्ध तबला वादक उस्ताद झाकीर हुसेन यांचा जन्म.

1822 ला आजच्या दिवशी चार्ल्स एग ग्राहम यांनी कृत्रिम दातांचा पेटंट नोंदविला.

## आजचे इंग्लिश शब्द : ( Animals / प्राणी ) :

1) Bear – अस्वल 2) Leopard - बिबट्या

3) Wolf – लांडगा 4) Bison – गवा

## आजची प्रश्नमंजुषा :

1) 1 मिनिट म्हणजे किती सेकंद?

2) मुख्य आणि उपदिशा सांगा.

3) 75 - 35 = किती?

4) वाळवंटात राहणाऱ्या प्राण्यांची नावे सांगा.

5) भारत देशात किती राज्ये आहेत?

आजची बोधकथा :

## गर्विष्ठ मोर

एक मोर होता. तो फार बढाईखोर होता. स्वत:च्या रूपाचा त्याला फार गर्व होता. तो दररोज नदीकिनारी जायचा. पाण्यात स्वत:चे प्रतिबिंब पाहून, स्वताच्या सौंदर्याची स्तुती करायचा.

मोर म्हणायचा, “ माझा डोलदार पिसारा पहा! त्या पिसाऱ्यावरील मोहक रंग पहा!! माझ्याकडे पहा! जगातील सर्वात सुंदर पक्षी मीच आहे.”

एकेदिवशी मोराला नदीकिनाऱ्यावर एक करकोचा दिसला. मोराने त्याचाकडे पाहून आपले तोंड फिरवले. आणि तुच्छतेने करकोच्याला म्हणाला, “ किती रंगहीन आहेस तू! तुझे पंख पांढरे फटक आणि निस्तेज आहेत.”

करकोचा म्हणाला, “ मित्रा, तुझा पिसारा नक्कीच सुंदर आहे. माझे पंख तुझ्यासारखी सुंदर नाहीत. पण म्हणून काय झालं? तुझ्या पंखांनी तू उंच उडू शकत नाहीस. मी मात्र माझ्या पंखांनी उंच उडू शकतो. “एवढे बोलून करकोचा ने आकाशात झेप घेतली. मोर मात्र खजील होऊन त्याच्याकडे पाहत राहिला.

तात्पर्य --- दिखाऊ सौंदर्यापेक्षा उपयुक्तता महत्वाची असते.